# १४. खेळातील स्वयंपाक

- **ऐका व म्हणा.**



पिठामध्ये पाणी घालतो,
तिंबून तिंबून कणीक मळतो.
भरभर भरभर पोळी लाटतो.
पोळीचा फुगा तव्यावरती फुगतो,
गरमगरम पोळी वाढतो.

विळीवरती वांगी चिरतो,
गरम मसाला त्यात भरतो.
कढईत तेल, मोहरी फुटता,
तिखट घालून रस्सा करतो.

डाळ, तांदूळ भांड्यात भरतो,
पाण्याची वर धार धरतो.
कुकरच्या तोंडात शिट्टी कोंबतो.
स्वयंपाक झाला, जाहीर करतो.

स्वयंपाक माझा डबीत मावतो,
तरीही आम्ही पोटभर जेवतो.
पचनासाठी दोन फळे,
प्रत्येकाला देऊन ठेवतो.

**– किशोर पाठक**

- **खालील कामांसाठी कवितेत आलेल्या कृती क्रमाने सांगा.**

(अ) पोळी करणे. (आ) भाजी करणे. (इ) भात करणे.

- **खालील कृतींसाठी कोणती साधने लागतात ते सांगा.**

(अ) पोळी भाजणे. (आ) भाजी चिरणे. (इ) भात करणे.

**शिक्षकांसाठी :** कविता तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावी. कवितेची एकेक ओळ म्हणावी. विद्यार्थ्यांना मागे म्हणायला सांगावे. विद्यार्थ्यांना स्वत:बरोबर कविता म्हणायला सांगावे. वर्गाबरोबर, गटात व वैयक्तिकरीत्या कविता तालासुरात, साभिनय म्हणून घ्यावी.

- **खालील अक्षरांपासून नवीन शब्द बनवा.**

  उदा., चा, रा, स, द, र, घ.

  शब्द – चारा, चार, रस, रास, दसरा, घर, दर, चादर, सरसर, सदरा.

  (अ) का, पा, य, ल.

  (आ) प, ना, सा, ट, क.

  (इ) क, मा, स, वी, र.

  (ई) मो, री, ह, र, णी, पा.

- **उपक्रम :**

  (१) घरी आई स्वयंपाक करत असताना निरीक्षण करा. पोळी, भाजी, भात करताना कोणकोणत्या कृती केल्या जातात, कोणत्या क्रमाने केल्या जातात ते लक्षात घ्या. वर्गात सांगा.

  (२) विद्यार्थ्यांकडून वर्गात भेळ तयार करून घ्यावी. त्याची कृती सांगण्यास सांगावे.

- **चित्र पाहा. वर्णन करा.**



